# प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे श्री.संदीप अर्जुनराव दाभाडे,वय ४६वर्ष,व्यवसाय पद–(महसुल सहायक),प्रस्तृतकार–३ ,तहसिल कार्यालय, शेगाव रा.कोठारी वाटीका नं.०४,मलकापूर,अकोला ता.जि.अकोला |
| लाच मागणी | लाचमागणी ३०००/– रुपये, तडजोडी अंती २५००/– रूपये |
| लाच स्विकारले | २५००/– रुपये |
| घटनास्थळ | तहसिल कार्यालय,शेगाव जि.बुलढाणा |
| घटना तारीख | ०८.०८.२०२३ |

**थोडक्यात हकीकत :–** यातील तक्रारदार यांची वडीलोपार्जीत ग्राम येऊलखेड ता.शेगाव येथे शेती असून सदर शेतीला वारसाहक्काने लागलेले नावा प्रमाणे शेती तक्रारदार यांचे वडील व काका यांचे नावाने करणे असल्याने त्याकरिता तुकडेबंदी आदेशानुसार सदर शेती नावावर करण्याकरीता अडचण येत असल्याने तक्रारदार यांनी ती शेती नावावर होणेकरीता उपविभागीय अधिकारी, खामगाव यांचेकडे परवानगी मिळणेबाबत अर्ज केलेला होता. त्या अर्जावरून एसडीओ ऑफीस खामगाव यांनी तहसिल कार्यालय,शेगाव यांना अहवाल मागीतला होता. सदरचा अहवाल तहसिल कार्यालय,शेगाव येथून उपविभागीय अधिकारी,कार्यालय,खामगाव येथे पाठविण्याकरिता लोकसेवक श्री.दाभाडे,प्रस्तृतकार–३,तहसिल कार्यालय,शेगाव यांनी ३०००/–रू. लाचेची मागणी करित असल्याबाबत लेखी तक्रार लाच लुचपत प्रतीबंधक विभाग,बुलडाणा यांचेकडे केली होती.

त्यानुसार दिनांक ०८.०८.२०२३ रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता, आलोसे श्री.संदीप दाभाडे, (महसुल सहायक),प्रस्तुतकार–३,तहसिल कार्यालय,शेगाव,यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोडी अंती २५००/– रुपये लाच मागणी करून तहसिल कार्यालय,शेगाव येथे लाच रक्कम २५००/– रुपये पंच क्र. १ यांचे समक्ष स्विकारली त्यावरुन आलोसे श्री.संदीप अर्जुनराव दाभाडे, पद–(महसुल सहायक),प्रस्तुतकार–३,वर्ग–३, तहसिल कार्यालय,शेगाव,यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन शेगाव शहर येथे कलम ७, भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

सदर कार्यवाही :– १. मा. श्री. मारोती जगताप, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो,अमरावती
२. मा. श्री. देविदास घेवारे, अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा व सापळा पथक श्री.महेश भोसले, पोलीस निरीक्षक, सफौ. शाम भांगे, पोहेकॉ/विलास साखरे,नापोकॉ. विनोद लोखंडे,जगदीश पवार,पोकॉ शैलेश सोनवणे,मपोकॉ. स्वाती वाणी,चालक नापोकॉ नितीन शेटे यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा.कार्यालय दुरध्वनी कमांक ०७२६२–२४२५४८ व ९६५७०६६४५५ तसेच टोल फि कमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा यांनी केले आहे.

( श्रीमती शितल घोगरे )
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा

Scanned with CamScanner